॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी (दि. १३) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सल्लागार समितीची बैठक आज दि. १३डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळीकुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, माजी कुलगुरू डॉ. के.बी. पाटील, श्री. यज्ञुवेंद्र महाजन, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत विद्यापीठाच्या गेल्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा कुलगुरूंनी सादर केला. यावर समिती सदस्यांनी चर्चा करून विद्यापीठाने गेल्या वर्षभरात उल्लेखनिय कामगिरी करून विद्यापीठाच्या नावलौकीकात भर पडणाऱ्या घटनांचे कौतुक केले.विद्यापीठाने एनआयआरएफ रँकीग, द विक हंसा या संस्थेने केलेल्या सर्व्हेक्षणात विद्यापीठाचा देशात ९ वा क्रमांक आल्याबद्दल कुलगुरू व सर्व अधिकार मंडळाचे अभिनंदन करण्यात आले. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात विद्यापीठाने ओपन इलेक्टीव्ह पुस्तकांचे केलेले प्रकाशन, सुरु केलेले नवीन अभ्यासक्रम त्यामुळे स्थानिक उद्योगांना उपलब्ध होणारे मनुष्यबळ याबाबत विशेष कौतुक केले. तसेच २०२६ मध्ये विद्यापीठाच्या केळी व्यवसाया संदर्भातील अभ्यासक्रम रचना व इतर नव्या प्रकल्पांना सहमती देण्यात आली. या बैठकीत व्य.प. सदस्य प्रा.जे.व्ही. साळी, प्रा. पवित्रा पाटील, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, सीए रवींद्र पाटील, प्रा. योगेश पाटील, प्रा. अजय पाटील, डॉ.दिनेश पाटील, प्रा. आशुतोष पाटील, प्रा.किर्ती कमळजा, प्रा. जयेंद्र लेकुरवाळे, प्रा. व्ही.एम. रोकडे, प्रा. समीर नारखेडे व वैशाली वराडे यांनी चर्चेत सहभाग नोंदवला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १३ डिसेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता